नमुना-५
दस्त क्र.(५००१ /२०१२)
९ —१५

सदर रक्कम ही अनामत म्हणुन दिलेली असुन ती आम्ही तुम्हांस सदर मिळकतीवर बांधणार असलेल्या इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेवर व महानगरपालिकेकडुन बांधकाम पुर्ण झाल्याचा दाखला आल्यानंतर बिनव्याज परत द्यावयाची आहे.

(७) वर नमुद केल्याप्रमाणे विक्री करून येणा-या रकमेत आमचा ५० टक्के हक्क व अधिकार राहील. सदर विक्री रकमे व्यतिरिक्त नियोजित खरेदीदाराकडुन येणा-या कायम स्वरूपी मेटेनन्स, लाइट व पाण्याच्या अनामत रकमा, खर्च यामध्ये आमचा कोणताही हक्क व अधिकार राहाणार नाहीं.

(८) यदाकदाचित वर नमुद केलेल्या मिळकतीवर जादा बांधकाम करण्याचे हकक भविष्यात मिळाल्यास अशा जादा बांधकामावर देखील लिहुन देणार यांचा ५० टक्के व लिहुन घेणार यांचा ५० टक्के हक्क राहील.

(९) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर तुम्ही आवश्यक ते इमारत नकाशे बनविले असुन आमचे सहीने सदर नकाशे महानगरपालिकेला सादर केले असुन महानगरपालिकेचे **तारीख १६-१-२०१२ रोजीचे पत्र नंबर एलएनडी/पंच/सी-२/१०००/५१३०** अन्वये ते मंजुर झालेले असुन सदर मंजुर इमारत नकाशाअन्वये तुम्हांस बांधकाम करण्याची आम्ही परवानगी दिली आहे. मात्र सदर नकाशा हा सुधारीतरित्या बनवुन तो महानगरपालिकेकडे मंजुरीसाठी सादर करु शकता, सदर मंजुरीसाठी जी जी कागदपत्रे अगर दस्तऐवज करुन दयावयाची असतील ती आम्ही करुन देवु, मात्र कागदपत्राचा, नकाशा बनविणेचा व तो मंजुरीचा संपुर्ण खर्च हा सर्वस्वी तुम्ही सोसावयाचा आहे. मंजुर इमारत नकाशान्वये मिळकतीवर बांधकाम करु शकता, त्यासाठी आर्किटेक्ट, इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर, सर्वेअर नेमु शकता, त्यांचेशी करार करु शकता व त्यांना विकसनाचे हक्क हस्तांतरित करण्याचे किंवा असाइन करू शकता व त्याअन्वये मिळकतीवर बांधकाम करु शकता, तसेंच मिळकतीवर बांधकामासाठी आवश्यक ते सर्व साहित्य व अवजारे आणु शकता, मात्र सदर बांधकामाचा, सदर इसमांचा पगार व फी हा सर्व खर्च हा सर्वस्वी तुम्ही सोसावयाचा आहे.

(१०) उपरोक्त मिळकतीवर तुम्ही बांधणार असलेले बांधकाम तुम्ही अन्य कोणासही विक्रीकामी सौदे करु शकता, त्यासाठी तुम्ही विसार पावती, साठेखत करारनामे, एमओयु, खरेदीखत, डेव्हलपमेंट करार, संमतीपत्र, भरणा पावती, कन्फर्मेशन डिड, रद्दबादल पत्र, रद्दबादल करारनामा, चुक दुरूस्ती, पुरवणी करार, डिक्लरेशन ऑफ अपार्टमेंट, डिड ऑफ अपार्टमेंट, वगैरे करू शकता व ते नोंदवु शकता, त्यासाठी वेळोवेळी रकमा स्विकारू शकता, मात्र सदर रकमा या तुम्ही वर नमुद केल्याप्रमाणे बॅंकेतील सदर प्रोजेक्टसंदर्भात उघडलेल्या खात्यात जमा करावयाच्या आहेत व सदर रकमेपैकी ५० टक्के रक्कम आमचे खात्यात परस्पर वर्ग होणार आहे.

Scanned by CamScanner

नमुना-५
दस्त क्र.(५७१ /२०१२)
२ — १५

(१६) सदर मिळकतीवर योजना राबवितांना बांधकामाचे वेळेस दुर्देवाने काही अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी दस्त लिहुन घेणार यांची राहील व अपघातामुळे होणा-या परीणामास दस्त लिहुन देणार हे जबाबदार राहाणार नाही तसेच दस्त लिहुन घेणार यांनी बांधकामाबाबतचे सर्व शासनाने नेमुन दिलेल्या सर्व सुचनाचा तसेंच कायदेशीर तरतुदीचे पालन करावयाचे असुन त्याची तोषिस दस्त लिहुन देणार यांना लागु देणार नाहीं सदर मिळकतीवर प्रकल्प राबवितांना नासिक महानगरपालिका कार्यालयाकडुन मंजुर झालेल्या नकाशाप्रमाणे बांधकाम न झाल्यास होणा-या परिणामाची जबाबदारी दस्त लिहुन घेणार यांची राहील.

(१७) सदरहु प्रकल्पाला **दिनकर हाईटस** हे नांव देण्याचे उभय पक्षांनी मान्य व कबुल केले आहे.

(१८) सदर मिळकतीमध्ये भविष्यात त्रयस्थ व्यक्तीचे हक्क व अधिकार निर्माण होईल असे कोणतेही कृत्त्य लिहुनदेणार अथवा त्यांचे वालीवारस करणार नाहींत.

(१९) वरील मिळकतीचा विकास बांधकामाबाबतचे नियमाचे पालन करून ठरलेल्या मुदतीत पुर्ण करण्याची जबाबदारी लिहुन घेणार यांची राहील व याकामी आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची जबाबदारी लिहुन देणार यांची राहील. सदर मिळकतीचा विकास करतांना काही अडचणी आल्यास उभय पक्ष एकमेकांच्या विचाराने एकमेकांना विश्वासत घेवुन अडचणीचे निवारण करतील व प्रकल्प राबवितांना कुठल्याही प्रकारे विलंब होणार नाही याबाबत दक्षता पाळतील.

(२०) सदरहु करारनामा उभय पक्षाचे वालीवारस, नॉमिनीज, असायनीज, ॲडमिनिस्ट्रेटर्स व प्रतिनिधी यांचेवर बंधनकारक राहील सदरहु दस्त करण्यापुर्वी दस्त लिहुन देणार यांनी त्रयस्थ व्यक्तीचे लाभांत कुठलाही व्यवहार केला नाही अथवा कोणाचेही लाभांत दस्त लिहुन दिलेले नाहींत.

(२१) प्रस्तुतचे करारांनुसार असे जाहिर करीतो की, उपरोक्त मिळकत ही संपुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची असुन ती आम्ही कोठेही गहाण, दान, तारण,अन्नवस्त्र,लिज, लिन, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जामिन, जप्ती, कुळ, वारस, मनाई हुकुम, जनरल मुखत्यार, लेखी अगर तोंडी करारमदार अगर अन्य कोणतेही जडजोखमीत गुंतविलेली नाही. मिळकतीचे मालकी हक्काबाबत, कब्जाबाबत, चतु:सिमाबाबत अगर हददीबाबत कोणतेही कोर्टात दावा न्यायप्रविष्ठ नाही. तसेंच सदर मिळकतीवर आमचे व्यतिरिक्त अन्य कोणीही आपला मालकी, हक्क, हितसंबंध अगर कब्जा सांगत नाही. याउपरही सदर मिळकतीवर आमचे व्यतिरिक्त अन्य कोणीही आपला मालकी, हक्क, हितसंबंध अगर कब्जा सांगितल्यांस किंवा मिळकतीवर बोजा अगर

Scanned by CamScanner

नमुना-५
दस्त क्र.(५०३१ /२०१२)
१९ — १५

येणेप्रमाणेचा डेव्हलपमेंटचा करारनामा आम्ही आजरोजी राजीखुषीने व स्वसंतोषाने लिहुन दिलेले आहे.

१. श्री.कन्हैय्यालाल दिनकर जोशी

२. श्रीमती पुष्पा दिनकर जोशी

३. श्री.सुभाष दिनकर जोशी

४. श्री.चंद्रकांत दिनकर जोशी
लिहुन देणार

मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे
डायरेक्टर श्री.श्रीकांत गंगाधर गायकवाड
लिहुन घेणार

साक्षीदार :-

(१) ----------

(२) ----------

डेव्ह / सिटीएस५८६६-बी

REGISTRAR Class-2

Scanned by CamScanner